# प्रकरण पांचवे -

# 'उपसंहार'

## उपसंहार

मलिका अमरशेख यांचे " मला उद्ध्वस्त व्हायचंय " आणि कुमुद पावडे यांचे " अंत:स्फोट " या दोन पुस्तकांचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यास या प्रबंधिकेतून मी केलेला आहे.

" मला उद्ध्वस्त व्हायचयं " हे मलिका अमरशेख यांचे आत्मकथन आहे, तर " अंत:स्फोट " हे कुमुद पावडे यांचे अनुभवकथन आहे. दोन्हीच्या धाटणीत फरक आहे. कलावंत स्वत: जे भोगतो, अनुभवतो त्याशी तद्रूप होऊन आत्मकथन लिहित असतो. त्यामुळे त्याच्यात तादात्म्यता आपणांस पहावयास मिळते, तर कलावंताने आपले भोगलेले अनुभवलेले अनुभव मांडत असतांना तटस्थतेने त्याकडे पाहून त्यावेवर केलेले भाष्य अनुभवकथनात असते. त्यामुळे त्याच्यात तटस्थता पहावयास मिळते. असा जरी या दोन कलाकृतीच्या धाटणीतील फरक असला तरी त्यात कांही समान सूत्रे आढळतात. दोन्ही कलाकृती या स्त्रियांनी लिहिलेल्या आहेत. लेखिकांनी स्त्री म्हणून आपणांस कसे जीवन जगावे लागले, पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत आपल्यास पूर्ण क्षमता असून कसे गौणत्व मिळाले, आपल्या मनाचा कसा कोंडमारा पुरुषी व्यवस्थेने केला, त्यातूनही आपली माणूस म्हणून जगण्याची आस कशी आहे सर्व भूमिका पार पाडून ही आपले जीवन कसे उपक्षिले गेले आहे याचे दर्शन घडविले आहे. म्हणून दोन्ही पुस्तकांची धाटणी वेगळी असली तरी त्यातील आशयाचे समान सूत्र आणि त्यातून स्त्रीवादी विचारसरणीचा कांही प्रत्यय येतों का यादृष्टीने हा अभ्यास आहे.

स्त्रीवादी दृष्टिकोनातून " मला उद्ध्वस्त व्हायचयं " आणि " अंत:स्फोट " या दोन कलाकृतींचा अभ्यास या लघु प्रबंधिकेमध्ये एकूण चार प्रकरणे केलेली आहेत. पहिले प्रकरण मराठी साहित्यातील स्त्री प्रतीमा यामध्ये स्थूलमानाने १८७४ ते १९६० पर्यंतच्या काळातील मराठी साहित्यातील स्त्री प्रतीमांचा शोध आणि काळानुसार त्यात होत गेलेला बदल याचा आढावा

घेतला आहे. हा आढावा प्रत्येक वाङ्मयप्रकारातील नसून तो कालखंडाच्या अनुषंगाने घेतलेला आहे.

इंग्रजांच्या आगमनानंतर त्यांची संस्कृती व वाङ्मयाने मराठी माणसाला दिपवून टाकले. शिक्षण प्रसारातून मराठी माणसाचे ज्ञान वाढू लागले, आणि तो व्यापकपणे आपले साहित्य व समाज यामध्ये डोकावू लागला. आपल्या ऱ्हासाची व मागासपणाची कारणे शोधू लागला आणि यातूनच सुधारणेचा डांगोरा पिटण्यात आला. मागासपणाचे कारणे तपासतांना स्त्रीकडे समाजाचे झालेले दुर्लक्षितपणे, तिचे अज्ञान, हे दिसून आले. हिंदू स्त्रीला संस्कृतीच्या नांवाखाली बंदिस्तच करण्यात आले होते. पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे दुय्यम स्थान दिल्याने ती मागासच होती. त्यामुळे समाजात अर्धे संख्याबळ असणाऱ्या स्त्रियांमुळे समाज मागासच राहिला याची जाणीव सुशिक्षीत लोकांना, समाजसुधारकांना झाली. आणि त्यातून जन जागृती करण्याचा प्रयत्न साहित्यिकांनी, समाजसुधारकांनी केला. समाज सुधारणेसाठी लेखणी हातात घेवून जाचक रुढीवर कोरडे ओढले. आणि साहित्यनिर्मितीला एक वेगळी दिशा लाभली. स्त्रीचे घरातील स्थान, स्त्री शिक्षण, बालविवाह, जरठ विवाह, केशवपन, सतीची चाल अशा जाचक रुढींना सुरुंग लावून स्त्रीला दास्यातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. स्त्रीचे समाजातील स्थान शोधण्याचा प्रयत्न करुन तिच्या स्वातंत्र्याचा विचार होवू लागला. या कालखंडात हरिभाऊ आपटे , वा. म. जोशी केशवसुत, राम गणेश गडकरी, खाडीलकर, ना. वा. टिळक, गो.वा.देवल, असे अनेक साहित्यिक होवून गेले. आगरकरांच्या समाजसुधारणेचा फार मोठा प्रभावही या साहित्यिकांवर झाला. त्यामुळे स्त्री शिक्षणाबरोबर स्त्रीवर लादल्या गेलेल्या जाचक रुढींचा खरपूस समाचार साहित्यातून घेण्यात आला. स्त्रीवर लादलेले बंधने त्यामुळे तिची झालेली पशूतुल्या अवस्था मांडली गेली. हरिभाऊनी " यमू " वा. म. जोशी यांनी "उत्तरा"

रागिणी देवलांनी " शारदा ", गडकऱ्यांनी " सिंधू ", अशी स्त्री पात्राव्दारे स्त्रियांचे दु:ख तिचे भावविश्व, केशवपन, बालविवाह, जरठकुमारी विवाह, वैधव्य अशा जाचक रूढीमुळे तिच्यावर अन्याय कसा होतो हे दाखवून या बंधनातून तिला मुक्त करुन तिच्याकडे माणूस म्हणून पाहण्याची गरज व्यक्त केली आहे. सुधारणेच्या नांवाखाली स्त्रीचे चित्रण जरी मराठी साहित्यातून येत असले तरी स्त्रीबध्दलचा सहानुभूतीचाच भाव साहित्यात आला. खरी स्त्री, स्त्री मनाचा शोध तिचे वास्तव जीवन साहित्यात उमटलेच नाही. ती काळाचीच मर्यादा होती. पण स्त्रियांकडे समाजाचे लक्ष वेधण्यात हे साहित्य निश्चितच महत्वाचे ठरलेले पहावयास मिळते.

१९२० नंतरचा कालखंड म्हणजे पहिले महायुध्द, फ्रेंच राज्य क्रांती, टिळक युगाचा अस्त व गांधी युगास प्रारंभ या घडामोडीतून निर्माण झालेला त्यामुळे सामाजिक परिस्थितीत थोडा बदल झाला होता. स्त्री प्रश्नांबरोबरच स्त्री मनाचा वेध घेण्याचा प्रयत्नही या कालखंडात साहित्यिकांनी केला. त्यामध्ये प्रामुख्याने श्री. व्य. केतकर, प्र. के. अत्रे, ना. सि. फडके, वि. स. खांडेकर आदी साहित्यिकांनी जे साहित्य निर्माण केले त्यातून तत्कालीन स्त्रीचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केले. प्र. के. अत्रे यांनी " घराबाहेर, "उदयाचा संसार " या नाटकांमधून स्त्रीची जागृती आणि त्यातून पुरुषी व्यवस्थेला दिलेला धक्का दाखवला आहे. केतकरांनी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आंतरजातीय विवाह, पुन:र्विवाह यांना साहित्यातून प्राधान्य देवून जाचक रूढींना छेद देण्याचा प्रयत्न केला आणि स्त्री समस्या मांडल्या. ना. सि. फडके यांनी शुध्द कलावादी दृष्टिकोन ठेवून मानवी जीवनातील शुध्द आणि सात्विक प्रेमाचे दर्शन घडवून स्त्रीकडे पहाण्याचा उदात्त दृष्टिकोन ठेवला, तर खांडेकरानी जीवनवादी दृष्टिकोनातून ध्येयप्रवण अशीच स्त्री चित्रीत केली. स्त्रीची प्रतिमा उजळविण्याचा प्रयत्न या साहित्यिकांनी केला असला तरी या कालखंडातील लेखकांचा सौंदर्यवादी दृष्टिकोन अधिक असल्यामुळे येथेही स्त्री चित्रणाच्या कांही मर्यादा जाणवतात.

१९४० नंतर स्वातंत्र्यप्राप्तीस एक वेगळे उधान आले होते. दुस-या महायुध्दाची झळ सा-या जगाला पोहचली होती. स्वातंत्र्य लढयात पुरुषा-बरोबरीने स्त्रीने भाग घेतला होता. शिक्षणामुळे स्त्री सज्ञानी झाली होती. मनोविश्लेषणाचे स्वरूप साहित्यात आले कारागीरीपेक्षा कलानिर्मिती हे प्रमुख ध्येय ठरले. व्यक्तीदर्शनाला महत्व आले. त्यामुळे साहित्यातील आशय अभिव्यक्तीत बदल झाला. या काळात मामा वरेरकर, रांगणेकर, अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, बा. सि. मर्ढेकर, विभावरी शिरुडकर, पु. भा. भावे, इंदिरा संत आदी साहित्यिक निर्माण झाले, मामा वरेरकरांचे " अपूर्व " बंगाल " रांगणेकरांचे "कुलवधु ", "माझे घर ", गंगाधर गाडगिळांच्या कथा , अरविंद गोखलेच्या कथा, विभावरी शिरुरकरांचे "बळी ", " हिंदोळ्यावर " आदी साहित्यातून स्त्री जीवनाचे चित्रण रेखाटले गेले. स्त्रीमनाचे दु:ख, तिच्या मनाचा हळुवारपणा, तिच्या निष्ठा, तिचे भावतरंग याचे चित्रण साहित्यात आले. स्त्रीमन उलगडण्याचा प्रयत्न लेखकांनी केला, पण फक्त पांढरपेशी स्त्रीचेच चित्रण साहित्यातुन झाले. सर्व सामान्य स्त्री चित्रण आलेच नाही. स्त्रीचा खोलवर वेध घेण्याचा प्रयत्न झालाच नाही. फडकेंच्या सौंदर्यवादाचाही प्रभाव साहित्यिकावर होता. त्यामुळे पुन्हा स्त्री चित्रण व्यापकपणे झालेच नाही.

१९६० नंतर मराठी साहित्यात अनेक नवे वाड.मयीन प्रकार निर्माण झाले. वेगळ्या जाणीवेचे साहित्य निर्माण होऊ लागले. स्वातंत्र्य, समता, बंधुता कायधाने मिळाली, पण ख-या अर्थाने रुजली नव्हती. शिक्षणाचे लोन खेड्यापर्यंत पोहचले. तरुण पिढी शिकून आपल्या व्यथा, वेदना साहित्यातून मांडू लागली. त्यातूनच दलित, ग्रामीण, कामगार, आदीवाशी, नागर असे वाड.मयीन प्रवाह निर्माण झाले याच बरोबरीने स्त्रीवादी साहित्याची निर्मीती या काळात झाली. यातूनच स्त्रीचे अधिकाधिक वास्तव चित्रण, तिचे मन, भावविश्व जीवन याचे चित्रण येवू लागले. त्यात प्रामुख्याने स्त्रियांच्या आत्मकथनांचा विचार पूढे येऊ लागला. अशा आत्मकथनातून येणारे स्त्रीचे चित्रण हे आज पर्यंतच्या साहित्यातून येणा-या स्त्री चित्रणापेक्षा वेगळे, वास्तव व प्रखर होते. हे वेगळेपण स्त्रीवादी

दृष्टीकोनातून तपासण्याची एक नवी चौकट, समीक्षा पुढे येवू लागली. आणि त्या दृष्टिने स्त्रीवाद, त्याचे स्वरूप स्त्रीवादी समीक्षा याचा तात्त्विक अभ्यास दुसऱ्या प्रकरणात केला आहे.

या दृष्टीने सुरवातीला पुरुषप्रधान संस्कृतीतील स्त्रीचे स्थान काय याचा विचार केला आहे. त्यामध्ये ज्या स्त्रीला एकूणच समाजव्यवस्थेत गौणस्थान देण्यात आले होते हे दिसून आले. संस्कृतीच्या नावाखाली जखडून तिची मुस्कटदाबीच केल्याचे जाणवते, पण स्त्री जेंव्हा शिक्षणामुळे ज्ञानी बनली तेंव्हा ती स्वत:बद्दल जागृतही झाली. तिला स्वत:च्याअस्तित्वाची जाण झाली. आणि त्यातूनच " स्वत्व ", " स्वाभिमान ", जागृत होवू लागला. आपल्या जीवनातील कारुण्य तिला जाणवले हेच मांडण्याचा प्रयत्न तिने करून आपला शोध घेण्याचा प्रयत्न तिने साहित्यातून केला.

ही जागृती मात्र प्रथम अमेरिकन स्त्रियांत झाली आहे. त्यामुळे तेथील स्त्रीवादी चळवळीचा आढावा घेतला. १८८० नंतर तेथील स्त्री शिक्षण घेवू लागली. विचार करु लागली. आपल्या स्वातंत्र्यासाठी तिला अनेक लढे द्यावे लागले. त्यातून मतदानाचा हक्क, समानतेचा हक्क तिने घेतला. ती नोकरी करु लागली. अर्थप्राप्ती करु लागली, पण तिला जाणवले की या समाजात आपणास मानाचे, हक्काचे स्थान नाही. या समाजाच सतत आपली कुचंबणाच होते स्त्री- त्वाच्या नांवाखाली दडपले जाते. स्त्रियावर अनेक बंधने आहेत. ही जाणीव स्त्रिला तिव्रतेने झाली. आणि स्त्रियांच्या होणाऱ्या अंतर्गत घुसमटीतून स्त्री मुक्ती चळवळ उभी राहिली. आणि अमेरिकेत स्त्रीवादाचा प्रचार व प्रसार जोमाने होवू लागला. या काळात अमेरिकन स्त्रीचे कौटुंबिक जीवन विसंगतीने भरलेले होते. ती मोठ्या संख्याने शिक्षण घेवून नोकरी करित होती. करिअर करु पहात होती. नोकरी करीत संसाराला हातभार लावत होती. यातूनच येथे ती " आदर्श गृहिणी " च्या प्रतिमेत अडकली. लवकर लग्न व्हावे, सुसज्ज घर, सुंदर , श्रीमंत नवरा, गुटगुटीत मुले, गाडी या पलिकडे स्त्रीची मागणी नव्हती. घरगुती खरेदी, नवरा व मुलांचा दिनक्रम ठरविणे, पुरुषाच्या जीवनात समान, भागीदार

आहोत असा तीला विश्वास होता. पण काही दिवसांची या प्रतिमेमुळे तिची घुसमट होवू लागली. असमाधान खदखदू लागले जीवनात अपूर्णता वाटू लागली. आणि आधुनिक गृहिणीची संकल्पना वठवतांना माणसासारखे आपल्यास जगता येत नाही. आपले मन आत्म गौरव, यशाची इच्छा मारून टाकून आपला कोंडमारा झाल्याचे तीला जाणवले आणि याकडे ती जेंव्हा अलिप्ततेने पाहू लागली. यातून तिला " स्वत्वाची " जाणीव झाली. त्याचबरोबर शिक्षण आणि सामाजिक कार्यातील क्रियाशील सहभाग या स्त्रीयांच्या प्राथमिक गरजा आहेत. याची जाणीव झाली आणि त्यातूनच स्त्रीवादी संकल्पना दृढमूल होवू लागली.

स्त्रीवाद म्हणजे पुरूषापासून फारकत घेवून स्वत:चा सवता सुभा निर्माण करणे नव्हे तर संस्कृतीने हजारो वर्षे स्त्रीचे मानवपण नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली त्यातून बाहेर पडून आपले अस्तीत्व प्रस्थापित करून घेणे होय. अशातून स्त्रीया आपला नवा पट मांडू लागल्या. सिमोन द बोव्हा सिक्सल यासारख्या स्त्रीयांनी स्त्रीवादाची संकल्पना रूढ केली स्त्री-वादातूनच स्त्रीवादी समीक्षा निर्माण झाली.

स्त्रीवादातील फिमेल, फेमिनिझम, फेमिनिष्ठ या संकल्पना पुढे आल्या. स्त्रीवादी समीक्षा ही राजकिय हेतूतून निघाली. पितृप्रधान संस्कृतीने स्त्रियांच्या अनुभवांना अनेकदा दाबून टाकले. म्हणून स्त्रियांनी साहित्यातून आपले अनुभव मांडणे व पितृप्रधान पध्दतीला वाड.मयीन माध्यमातून धक्का देणे स्त्रीवादी साहित्य मानले गेले. तसेच समाजातील स्त्रीची प्रतिमा जी पुरूषांनी निर्माण केली आहे. तिला नकार त्यांनी दिला. पुरूषी वर्चस्वामुळे स्त्री ही माणूस आहे. हे दुर्लक्षीले गेले त्याकडे त्यांनी लक्ष वेधले. पुरूषी वर्चस्वामुळे स्त्रीही माणूस व अराजक यांच्या सीमेवर बसवून स्त्रियांना मुख्य प्रवाहातून बाजूला लोटले गेले यात एक तर तीला देवी, माता, पतिव्रता असे उज्वल स्वरूपात गणले गेले तर दुसरीकडे हडळ, कैदाशिण, वेश्या विधवा, अशा हीन वर्गात गणना केली. तिच्याकडे माणूस म्हणून पाहिले गेले नाही. तीला मुख्य प्रवाहातून बाजूला ढकलण्याचे

पुरुषी राजकारण दिसले यामुळे स्त्रीवाद हा " माणूस " या भूमिकेतून स्त्रीचे चित्रण करतो. समाजामध्ये प्रस्थापित असलेले लिंगभेदावरच आधारलेली संकेत बदलले जावे ही स्त्रीवादाची भूमिका आहे.

माणसाच्या समाजत स्त्रीला समतेचे स्थान देणे, " पुरुषी " आणि " बायकी " अशा विरोधात्मक ठरविल्या गेलेल्या मूल्यावर हल्ला करणे, भेदामधील वास्तवता नजरेसमोर आणणे यातून स्त्रीवादी समीक्षेची बैठक तयार झाली आहे. त्याचबरोबरीने पुरुषी वर्चस्वामुळे स्त्रीच्या अनेक अनुभवांचा भाग हा अंधारातच राहिला. अशा अंधारात असलेला भाग उजेडात आणणे हे स्त्रीवादी समीक्षेचे उदिष्टे ठरले. आणि स्त्रीपुरुष भेदापलिकडे जावून कलावंत म्हणून जीवनातील कांही विलक्षण अनुभव साहित्यातून व्यक्त होवू लागले. स्त्रीवादी साहित्याची भूमिका जशी प्रस्थापितांविरोधी बंड करण्याची आहे तशीच ती शोधकांची देखील आहे हा शोध स्वत:चा आहे हा शोध तीला माणूसपणाकडे नेणारा आहे.

अशा प्रकारे स्त्रीवाद, त्याचे स्वरूप, उदि्दष्टे आणि स्त्रीवादी समीक्षा यांचा स्थूलमानाने तात्विक आढावा घेऊन ख-या अर्थाने प्रकटलेले स्त्रीमन तिच्या आत्मचरित्रातून व्यक्त झाल्याचे दिसून आले आणि त्यामुळेच निवडलेल्या दोन कलाकृतीतील स्त्रीवादी दृष्टिकोन शोधण्याचा प्रयत्न तिस-या व चौथ्या प्रकरणात केला आहे.

" मला उद्ध्वस्त व्हायचयं " या मलिका अमरशेख यांच्या आत्मकथनाचा स्त्रीवादी दृष्टीकोनातून अभ्यास तिस-या प्रकरणात केला आहे. " मला उद्ध्वस्त व्हायचयं " हे मलिका अमरशेख यांचे आत्मकथन. मलिका ही शाहीर अमरशेख यांची मुलगी आणि दलित साहित्यिक " दलित पँथरचा " नेता नामदेव ढसाळ यांची पत्नी. आपल्या बालपणापासून ते प्रौढ वर्षापर्यंत आपल्या वाटयाला आलेले अनुभव तिने यात मांडले आहेत. आनंदी आणि लाडात गेलेले बालपण, वडिलांच्या मृत्युनंतर आनंदाला लागलेले ग्रहण,

त्यानंतर बहिणीने सावरलेले कुटुंब, पुन्हा चैतन्यमय वातावरण याचे कथन तिने सुरवातीस केले आहे. पुढे घराच्या सामाजिक राजकिय पार्श्वभूमीमुळे अनेक लोकांशी संबंध आला त्यातूनच " दलित पँथर " या नव्या जोमाने वावरणा-या संघटनेशी त्यांच्या घरचा संबंध आला. त्या संघटनेतील कार्यकर्त्यांचे येणे जाणे सुरु झाले. त्यातूनच नामदेव ढसाळ यांची ओळख झाली त्यांच्या एकूणच व्यक्तिमत्वामुळे, कवीत्वामुळे मलिका त्यांच्याकडे आकर्षिली गेली. त्यातूनच भावी जोडीदार म्हणून त्याचा स्विकार केला. कवी मनाची, स्वतंत्रवृत्तीची मलिका एका श्रेष्ठ साहित्यकाची, पुढा-याची पत्नी म्हणून वावरु लागली, परंतू इथूनच तिच्या आयुष्याला एक वेगळी कलाटणी मिळाली. कुटुंबात राहून देखील कौटुंबिक जबाबदा-या न स्विकारणा-या नामदेवामुळे तिला जीवन एकाकी वाटू लागले. नामदेवचे बेजबाबदार वर्तन, त्याचा पुरुषी अहंकारी स्वभाव, व्यसनाधिनता, इतर स्त्रियांशी संबंध, यामुळे ती दिवसेंदिवस खचत गेली. तिचे हे खचणे या व्यवस्थेतील समस्त स्त्री जातीचे असल्याने तिच्या संपूर्ण आत्मकथनातील आलेल्या अनुभवाचा स्त्रीवादी दृष्टीने विचार केला आजच्या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीचे असलेले स्थान, तिचा पुरुषी वर्चस्वामुळे झालेला कोंडमारा आणि त्यातून मुक्त होवू पाहणारे स्त्रीमन, तिचे भाव-विश्व तपासत असतांना जी स्त्रीवादाची वैशिष्टेय गृहित धरली आहेत. त्याची प्रचिती या आत्मकथनामध्ये आढळून आलेली दिसली. स्त्रीवादाच्या दृष्टीने स्त्रीचे अनुभव स्त्री शरीर अनुभवासह व्यक्त करण्यावर दिलेला भर याचेही प्रत्यंतर या आत्मकथनात आपल्याला दिसून येते. असे जरी असले तरी या आत्मकथनामध्ये कांही मर्यादा जाणवतात, तरी देखील स्त्रीवादाची जी वैशिष्टये आहेत त्याचा प्रत्यय मात्र या कलाकृतीतून स्पष्टपणे जाणवतो त्यामुळे हे आत्मकथन स्त्रीवादी साहित्याच्या दृष्टीने महत्वाचे ठरते.

स्त्रीवादी दृष्टिकोनातून " अंत:स्फोट " चा अभ्यास चौथ्या प्रकरणात केला आहे. त्यांच्या एकूण बारा लेखात आलेल्या कांही आठवणी व अनुभव यातून भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीचे असणारे स्थान तीचे जीवन चित्रण करण्याचा

जो प्रयत्न केला, त्याचे आजच्या स्त्रीवादाच्या दृष्टीने मूल्यमापन केले आहे. आजपर्यंत संस्कृतीच्या सभ्यतेच्या नांवाखाली स्त्रीजातीवर जी बंधने लावली आहेत त्याचा स्त्री स्वतंत्र वृत्तीने विचार करु लागली तेंव्हा तीला झालेली स्वत्वाची ओळख आणि आपल्या अस्तीत्वाचे भान येऊ लागले. त्यामुळे ती या परंपरेच्या बाहेर पडण्याचा प्रयत्न करु लागली. त्याच बरोबर त्या परंपरेची विवेक बुध्दीने चिकित्सा करुन त्यातील फोल पणावरही ती भाष्य करु लागली अशाच प्रकारचे भाष्य कुमुद पावडे यांनी कांही रुढी परंपरे विरुध्द करुन त्यातून स्त्री मुक्तीचा विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या जीवनात आलेले अ नुभव भेटलेल्या व्यक्ती, समाज व्यवस्था यातून दबली जाणारी स्त्री तीचे जीवन हे या कलाकृतीचे मुख्य सूत्र आहे. आपल्याला जीवन जगत असताना स्त्री म्हणून आलेले अनुभव त्यानी "सावित्री व्रताची सांगता," " आम्ही तर बोलून चालू स्त्रियाच ", " माझ्या संस्कृतची कथा " , " आऊट साईडर व मी " , संस्कार एक जीव घेणी आगळीक " या सारख्या अनुभवातून जाणून मांडले आहे त्यात प्रामुख्याने लेखिकेला त्या व्यवस्थेत असलेले दलिताचे स्थान आणि त्यातही स्त्री म्हणून तिला मिळालेली वागणूक याचा उल्लेख केला आहे. स्त्री कितीही शिकली, सवरली तरी आजही तिला या पुरुष प्रधान व्यवस्थेत असणारे स्थान हे दुय्यमच आहे. याचा प्रत्यय त्यांच्या या कथनातून येतो. शिवाय स्त्रियांचे प्रश्न, तिच्या समस्या यांकडे पुरुषाची राजकिय दृष्टीकोणातून पाहिल्याने त्यांच्या सहानुभूती ऐवजी स्वार्थी वृत्तीच जास्त आहे हेही जाणू लागते. या व्यवस्थेतील पुरुषी वर्चस्वाखालील दडपली जाणारी स्त्री, तीचे जीवन चित्रण जसे येते तसेच या संस्कृतीत सभ्यता, रुढी, परंपरा याच्या नांवाखाली स्त्रीला ज्या बंधनात गुरफटलेले गेले, त्यामुळे स्त्रीचा झालेला कोंडमारा याचाही प्रत्यय सावित्री व्रताची सांगता, बंधनाच्या पलीकडे, शरदातील एक सकाळ, दुपार आणि संध्याकाळ, मला अहेव मरण नकोच, अपूर्व जन्म, इत्यादी कथनातून येतो. परंपरात जखडलेल्या स्त्रीचे जेस चित्रण आहे तसेच ही परंपरा किती फोल आहे यावरही प्रकाश टाकला आहे. म्हणून सावित्री व्रताची सांगता या एका कथ नातून मायावती सारख्या स्त्रीच्या ठिकाणी आत्म जागृति करुन

तीलाही आपण माणूस आहोत हे पटवून देऊन अशा व्रत वैकल्यातून मुक्त केले आहे. यातील मायावती ही एक प्रतिक आहे. त्यामुळे मायावतीच्या निमित्ताने संपूर्ण स्त्री मुक्तीचा विचार येथे प्रकटला आहे. हेच आजच्या स्त्रीवादी साहित्याचे वैशिष्टय आणि त्याचा या प्रकरणात उहापोह केला आहे. याच बरोबर स्त्री जेंव्हा जागृत होऊ लागली तेंव्हा तिच्या आत्मभानाबरोबर एक वैचारिकता आली. त्यामुळे ती रुढी परंपरा, या बंधनाच्या पलिकडे जाऊ लागली त्यातून तिचे आजचे वास्तव जाणवते. ज्या परंपरेत तिला खुरटले जात होते. त्या परंपरेलाच या ठिकाणी छेद देण्याचा ती प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. एकूणच या कलाकृतीतील कांही आठवणी व अनुभव यातून स्त्री स्वातंत्र्य, स्त्री मुक्तीचा विचार आला आहे. स्वत:च्या जीवनानुभवाबरोबर इतरांच्याही कांही आठवणींच्या निरिक्षणातून केलेले हे चित्रण आहे. त्यातील जे विचार अनुभव आले आहेत त्याचा विचार केल्यास स्त्रीवादाची कांही वैशिष्टये मात्र निश्चित जाणवली आहे ते या प्रकरणात विस्ताराने घेतले आहे. एकूण या प्रबंधीकेच्या चार प्रकरणातून मराठी साहित्यामध्ये नव्यानेच प्रवाहीत झालेल्या स्त्रीवादाच्या अनुषंगाने अभ्यासाची दिशा मी निश्चित केली आहे.

(आज स्त्रीमुक्ती चळवळ थंडावल्याचे जाणवते. त्यामुळे चळवळीच्या अनुषंगाने निर्माण होणारे साहित्य हे देखील आज निर्माण होतांना दिसत नाही. स्त्रियांनी लिहिलेल्या कलाकृतींना सुरवातीच्या काळात मान्यता मिळाली पण नंतर त्यामध्ये देखील तोच तो पणा येवू लागला. एक तर स्त्रीमुक्ती चळवळ ही एका विशिष्ठ मध्यमवर्गीय स्त्रियांपुरतीच मर्यादित राहिली. एकूणच स्त्रिच्या शोषणाचा व्यापक विचार यामध्ये येवू शकला नाही. ग्रामीण स्त्री, कष्टकरी स्त्री, दलित स्त्री यांच्या दु:खानां या साहित्यात किती अवसर मिळाला ? हा देखील प्रश्न या निमित्ताने चर्चेसाठी घेणे आवश्यक आहे. ही या स्त्रीमुक्ती-चळवळीची जरी मर्यादा असली तरी एकूणच स्त्रियांना मग ती विशिष्ठ वर्गातील का असेना जे आत्मभान प्राप्त झालेले आहे त्यांच्यात जी जाणीव जागृती निर्माण

झाली आहे त्याचे स्पष्ट प्रकटीकरण आणि स्त्रीच्या सन्मानाचा, प्रतिष्ठेचा आग्रह यासाठी पारंपारिकतेला छेद देण्याची वृत्ती आपल्या भावनांचे उदात्तीकरण न करता माणूस म्हणून त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि ज्या व्यवस्थेमध्ये स्त्रियांचे शोषण सुरु आहे त्या व्यवस्थे विरुध्दचा आक्रोश म्हणून स्त्रियांच्या अशा कांही कलाकृतीकडे अभ्यासकांचे लक्ष वेधता येते. मानवी समाजात स्त्रीला समतेचे स्थान देणे " पुरुषी " आणि " बायकी " अशा विरोधात्मक ठरविल्या गेलेल्या मूल्यांवर हल्ला करणे आणि पुरुषी वर्चस्वामुळे स्त्री अनुभवाचा अंधारात असलेला भाग उजेडात आणणे या स्त्रीवादी वैशिष्ट्यांचा अढळ अशा कलाकृतीतून होत आहे. स्त्रीवादी साहित्याची भूमिका जशी प्रस्थापिता विरुध्द बंड करण्याची आहे. तशीच ती शोधकाची देखील आहे. या दृष्टीने " अंत:स्फोट " आणि " मला उदध्वस्त व्हायचंय " या दोन्ही पुस्तकातून हीच भूमिका स्पष्टपणे पुढे आलेली आहे. म्हणून या दोन्ही कला-कृती आजच्या स्त्रीवादी साहित्य समीक्षेच्या दृष्टीने उल्लेखनीय ठरतात.

## संदर्भ सूची


| लेखकाचे नांव | पुस्तकाचे नांव |
| --- | --- |
| (१) प्रका - अ.अ. कुलकर्णी | प्रदक्षिणा खंड पहिला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे सातवी आवृ-ती, १९८०. |
| (२) प्रका - अ.अ. कुलकर्णी | प्रदक्षिणा खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे प्रथम आवृ-ती, १९९१. |
| (३) डॉ. अश्विनी धोंगडे | स्त्रीवादी समीक्षा-स्वरूप आणि उपयोजन, दिलीपराज प्रकाशन, २५१, क, शनिवार, पेठ, पुणे-४११०३० प्रथम आवृ-ती, १९९३. |
| (४) डॉ. अंजली सोमण | साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, १३५९, सदाशिव पेठ, पुणे-४११०३० , प्रथम आवृ-ती, १९८९ |
| (५) डॉ. अंजली सोमण | मराठी कथेची स्थितिगती, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे प्रथम आवृ-ती, १९९५. |
| (६) डॉ. सौ. कल्पना परांजपे | मराठी सामाजिक नाटक आणि स्त्री समस्या, श्री गंधर्व-वेद प्रकाशन, १२८६, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृ-ती, १९८४. |
| (७) प्रा. कुमुद पावडे | अंत:स्फोट, प्रकाशक-शंकरराव उ. हातोले, आनंद प्रकाशन, जयसिंगपुरा, औरंगाबाद, व्दितीय आवृ-ती, १९९५ |
| (८) गीता साने | भारतीय स्त्री जीवन, मौज प्रकाशनगृह, खटाववाडी, मुंबई, प्रथम आवृ-ती, १९८६ |
| (९) डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर | मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाउस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०, प्रथम आवृ-ती, १९८९. |

(१०) संपा – प्रा. चंद्रकुमार नलगे गंगाधर पानतावणे — स्त्री आत्मकथन, सुरेश एजन्सी, २०५, शुक्रवारपेठ, पुणे-४११००२, प्रथम आवृ-ती, १९९०.

(११) तसलिमा नासरिन — निर्वाचित कलाम (निवडक लेख), अनुवाद – मृणालिनी गडकरी मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृ-ती, १९९६.

(१२) दया पवार — बलुत

(१३) संपा – धनंजयकीर, स. ग. मालशे — महात्मा फुले समग्र वाङःमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, नवीन प्रशासन भवन, मुंबई-४०००३२ तिसरी आवृ-ती, १९८८.

(१४) डॉ. नरहर कुरुंदकर — धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे.

(१५) निलिमा भावे — स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊल खुणा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-४०००३४ प्रथम आवृ-ती, १९८९-९१.

(१६) प्रका – सौ. नंदिनी तु. गवळी — बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रकाशक-सौ. नंदिनी गवळी, ५१३ ब-प्लॉट नं. ४/अ, नलवडे कॉलनी, सम्राट नगर, सागरमाळ, कोल्हापूर-४१६००८ प्रथम आवृ-ती, १९९१.

(१७) भालचंद्र फडके — मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन, श्री विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे, पहिली आवृ-ती, १९८०.

(१८) [illegible] मलिका अमरशेख — [illegible] मला उद्ध्वस्त व्हायचंय, मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगांव मुंबई-४. आवृ-ती पहिली, १९८०

(१९) मलिका अमरशेख, ९४, हाजी कासम चाळ, शाहीर अमरशेख मार्ग, जेकब सर्कल, मुंबई-११.

(१९) वि.स. खांडेकर — ययाती.

(२०) संपा - शरणकुमार लिंबाळे — मराठी वाङ:मयातील नवीन प्रवाह, मधुराज पब्लिकेशन्स, शनिवार पेठ, पुणे. प्रथम आवृ-ती

(२१) डॉ. सदा क-हाडे — मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी लोकवाङ:मय गृह, भूपेश गुप्ता भवन, ८५ सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई. दुसरी आवृ-ती, १९९०.

(२२) संपा- हेमंत विष्णु इनामदार, अंजली सोमण — विस्तारलेलं क्षितिज, संजय प्रकाशन, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे. व्दितीय आवृती, १९९४.

(

## नियत कालिके

(१) महाराष्ट्र साहित्य पत्रिका — अंक २८३, दिवाळी १९९७, संपादक-ह. ल. निकमसे.

(२) दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका

(३) महाराष्ट्र साहित्य पत्रिका — १९९१.